"महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या राजकीय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास "

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेतील राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी पदवीकरता सादर करण्यात आलेला शोध प्रबंध

संशोधक

सत्यवान नामदेव रेपे

मार्गदर्शक

प्रा.डॉ. प्रताप वामनराव पाटील
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
(सहयोगी प्राध्यापक)
बहिर्जी स्मारक महाविद्यालय वसमत,
ता. वसमत, जि. हिंगोली.

२०२१

"महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या राजकीय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास "

प्रस्तावना

भारतीय संघराज्यात महाराष्ट्र हे पुरोगामी विचारांचे राज्य म्हणून ओळखले जाते. देशातील विविध सामाजिक राजकीय सूधारणांच्या चळवळी महाराष्ट्रातून सूरू झालेल्या दिसून येतात. यामधून डाव्या विचाराने प्रभावित झालेल्या बऱ्याच संघटना महाराष्ट्रात स्वातंत्र्यपूर्व काळात प्रथम सूरू झाल्या महाराष्ट्राच्या पूरोगामी विचाराला त्यामधून चालना मिळाल्याचे दिसून येते.

भारतीय शेतकरी संघटनेने मार्क्सवाद लेनिनवाद यांचा मार्गदर्शक सिध्दांत म्हणून स्वीकार केला आहे. या मार्गदर्शक सिध्दांतानूसार आर्थिक व सामाजिक समतेवर आधारलेले शेतकरी व कामगारांचे राज्य स्थापन करण्याचा आणि ज्यात मानवाची मानवाकडून पिळवणूक होणार नाही असा वर्गविहीन समाज निर्माण करण्याचा महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचा निर्धार आहे.

देशातील शेतकरी वर्गात अस्वस्थता व असंतोष निर्माण होत होता. स्वतंत्र भारताच्या व्यवस्थेत आपली स्थिती सुधारणेंची चिन्ह दिसत नाहीत याची खात्री शेतकऱ्यांना येत होती. या असंतोषातून देशाच्या विविध भागात शेतकरी संघटीत होऊन आंदोलने उभारण्याच्या मनःस्थितीत होते. अशाप्रकारच्या आंदोलनाचा उद्रेक १९७० नंतर देशाच्या विविध प्रांतात तामिळनाडू, कर्नाटक, पंजाब, गुजरातमध्ये झालेला दिसतो. या आंदोलनाची दिशा व स्वरुप एकूणच पूर्वापार चालत आलेल्या शेतकरी आंदोलनाला नवजनवादी आशय प्राप्त झाला होता कारण ही आंदोलने सर्वसाधारणतः १९७० नंतर उभी राहीलेली असून त्यामागे त्यांनी निश्चित आशा शोषण विरोधी विचारांची चौकट उभी करून शासनाला विरोध केला होता. शेतकऱ्यांचे आंदोलने चालविणाऱ्या शेतकऱ्यांच्या या संघटना अराजकीय स्वरूपाच्या असून सत्ता प्राप्तीत त्यांना स्वारस्य नसल्याचे त्यांनी प्रथमच घोषित केले होते. त्यामुळे या आंदोलनाला शेतकऱ्यांचा अभूतपूर्व पाठिंबा मिळाला. शेतकऱ्यांचे

असे पहिले शेतकरी आंदोलन तामिळनाडू राज्यांतील कोईमतूर जिल्ह्यात श्री नारायण स्वामी नायडू यांच्या नेतृत्वाखाली उभे राहिले, महाराष्ट्रामध्ये कम्यूनिस्ट पक्षाची किसान सभा , शेतकरी कामगार पक्ष, कष्टकरी संघटना, श्रमिक संघटना इत्यादींनी शेतकऱ्यांना संघटीत करण्याचा प्रयत्न केला.

१९८० चे दशक हे एका अर्थाने पारंपारिक चळवळीच्या अस्ताचे दशक मानावे लागेल. या दशकापासून विविध क्षेत्रात उदयाला आलेली आंदोलने व चळवळी ह्या साकल्यलक्षी Holistic न राहता त्या विशिष्ट उद्दीष्ट लक्षी Specific स्वरुपात पूढे आल्या. महाराष्ट्रातील शेतकरी संघटना हे त्यांचे उत्कृष्ट उदाहरण मानावे लागेल, कारण या संघटनेने शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळाला पाहिजे. यासाठी पहिल्यांदाच शेतकरी वर्गाला संघटित केल्याचे दिसते. तत्पूर्वी १९८० मध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न आदिवासी कष्टकरी शेतमजूर इत्यादींशी जोडले जात होते. त्यातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उपेक्षाच होत होती ती विचारात घेऊन शेतकरी संघटनेने शेतमालाच्या रास्त भावाचा प्रश्न हाती घेऊन त्यासाठी समग्र शेतकऱ्यांचे संघटन केले आणि विराट आंदोलने उभारली. हा नाविन्यपूर्ण दृष्टिकोन शेतकऱ्यांच्या प्रश्नासबंधी ज्ञाननिर्मीतीचे साधन म्हणून पूढे आलेला आहे. अनेक विद्ववानांनी व अभ्यासकांनी शेतकरी संघटनेचा नवसमाजिक संघटनेच्या दृष्टिकोनातून अभ्यास केलेला आहे म्हणून शेतकरी संघटनेचा त्या अंगाने आढावा घ्यावयचा आहे.

देशाच्या अनेक भागात शेतकरी आपले प्रश्न घेऊन शासन विरोधात आंदोलने करीत होती. महाराष्ट्र राज्य जे देशातील सामाजिक व राजकीय संघटनेचे केंद्र मानले जाते. अशा महाराष्ट्र राज्यातही शेतकरी दुर्लक्षित राहिला होता. त्याच्या प्रत्यक्ष जीवन व्यवहाराशी निगडीत असलेले शेतीचे प्रश्न निकाली निघत होते. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात १९७९-८० साली अन्नधान्य व कांद्याचे प्रचंड उत्पन्न झाले त्यामुळे अन्नधान्य व कांद्याच्या भावात मोठी घसरण झाली, मात्र कांद्याची विक्री करण्याशिवाय शेतकऱ्यांसमोर दुसरा पर्याय नव्हता. माल विकण्याची चिंता

शेतकऱ्यांना भेडसावू लागली , भाव गडगडले, जास्त पिक आले तरी पदरी तोटा अशी परिस्थीती निर्माण झाली. त्यामुळे शेतकऱ्यांत शासनविरुध्द असंतोष धूमसू लागला. कॉग्रेसची व्यापारी व भांडवलदार धार्जीणी धोरणे आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयीच्या बेफिकीर वृत्तीने शेतकरी आंदोलनाला चालना मिळाली. फेब्रुवारी १९७८ च्या क्रांतीदिनी चाकण जि. पूणे येथे संघटनेची पहिली कचेरी उघडण्यात आली हीच शेतकरी संघटनेची स्थापना मानली जाते. शेतकरी आंदोलनाचे अध्वर्यू शरद जोशी हे संघटनेचे संस्थापक होते. माधवराव मोरे, माधवराव बोरसे, प्रल्हाद पाटिल, भास्करराव बोरवके हे शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशीबरोबर शेतकरी संघटनेच्या स्थापनेत अग्रेसर होते. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव ही, संघटनेची एकमेव मागणी, कार्यक्रम व उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टांतच संपूर्ण देशातील दारिद्र्य उच्चाटनाची क्षमता आहे. त्यासाठी शेतीमालाला रास्त भाव मिळणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन शरद जोशी यांनी केले.

श्री शरद जोशी यांनी १९७८ पासून खेड तालूक्यातील भामनेर चाकण परिसरात बाबूलाल परदेशी व शंकरराव वाघ यांना बरोबर घेऊन शेतकऱ्यांच्या दारिद्र्यांचा मागोवा घेण्यास सूरुवात केली ते रस्ते,पाणी ,वीज यापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना त्या कारणांची जाणीव करुन देत होते आपले दारिद्र्य निसर्गदत्त नसून मानव निर्मित आहे. शेतीमालाला त्याचा खर्च सूध्दा भरुन येऊ नये. केवळा थोडकीच किंमत मिळेल असे जे सरकारचे धोरण आहे. ते शेतकऱ्याला अधोगतीकडे नेण्यासारखे आहे. दारिद्र्यातून सूटायचे असेल तर शेतऱ्यांनी संघटीत होणे आवश्यक आहे. संघटनेच्या बळावरच शेतीमालाला रास्त भाव मिळवता येईल असे शेतकरी संघटना शेतकऱ्यांना सांगत होती. चाकण परिसरातील शेतकऱ्यांत शेतीमालाच्या भावाबाबत जागृती निर्माण झाली तो शेतीमालाच्या भावाबाबत सजग झाला.

शरद जोशी म्हणतात, १९७८ सालातील कांद्याच्या लढ्याला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला तेव्हा माझ्या एक गोष्ट ध्यानात आली की शेतीमालाच्या

भावाच्या प्रश्नांवर शेतकऱ्यांची एकी करण फार सोपे आहे. इतर कूठल्याही मूद्दांवरती शेतकऱ्यात वाद-विवाद होत असतात पण त्यांची शेतीमालाच्या भावाबाबत त्यांच्यात वाद असण शक्यच नव्हत. शेतकऱ्यांची संघटना होणे शक्य नाही असे एकेकाळी बोलले जात होते. शरद जोशींनी शेतकऱ्यांची अभेद्य अशी संघटना उभारून ते भाष्य खोटे ठरविले आहे.

शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव मिळाला पाहिजे, हा एकमेव कार्यक्रम समोर ठेवून श्री शरद जोशी यांनी ९ ऑगस्ट १९७९ रोजी 'शेतकरी संघटनेची ' स्थापना केली. १९७९-८० साली अन्नधान्याच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाल्याने बाजारपेठेत अन्नधान्याचे भाव कोसळले त्यामूळे शेतकरी वर्गात नैराश्य पसरले दुष्काळ असला तरी तोटा आणि सूकाळ असला तरी तोटाच पदरी येतो हे पाहून शेतकऱ्यात शासनाविरुध्द असंतोष धूमसू लागला. शेतकऱ्यातील असंतोषला आकार देऊन त्याला शासनविरुध्द उभा करण्याचे काम शेतकरी संघटनेने केले आहे. त्यातून शेतकरी आंदोलने उदयास आली. मात्र एवढ्या एकाच कारणाने शेतकरी संघटनेचा उदय झाला असे नाही. त्याला इतरही काही कारणे कारणीभूत आहेत. राजकीय अस्थिरता, कॉंग्रेस श्रेष्ठीची भूमिका, पक्षीय निष्प्रभता, शेती उत्पादनात झालेली प्रचंड वाढ, खते बि-बियाने आणि शेती अवजारांच्या वाढणाऱ्या किंमती, युरोपातील नवचळवळीची प्रेरणा, शासनाचे शेतीविषयक धोरण, या कारणामुळे शेतकरी संघटनेच्या उदयाची कारणे आपल्याला पहायला मिळतील.

महाराष्ट्रामध्ये अलिकडच्या काळामध्ये किसान लॉंग मार्च काढण्यात आला होता तो भारतीय कम्यूनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) च्या किसान आघाडीच्या अखिल भारतीय किसान सभेने आयोजित केलेल्या महाराष्ट्र राज्यातील किसान रॅली किंवा किसान लॉंग मार्च या नावाने ओळखला जातो. हा मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सहभागी होऊन १८० कि.मी अतंर चालले होते. नाशिकमधून किसान लॉंग मार्चची सुरूवात झाली होती. व तो मोर्चा महाराष्ट्रातील विधानभवनावर जाऊन पोहचला होता महाराष्ट्र शासनाने मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्यानंतर शांततापूर्ण

मार्गाने या मोर्चाचे विर्सजन १२ मार्च २०१८ रोजी करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने दिलेली आश्वासने पूर्ण केलेली नाहीत, हे लक्षात आल्यानंतर किसान लाँग मार्च दुसऱ्यांदा आंदोलन करण्याचे ठरविले व दुसरा किसान लाँग मार्च २७ फेब्रुवारी २०१९ रोजी सुरुवात झाली परंतू तो मोर्चा लवकरच निलंबित करण्यात आला किसान लाँग मार्च काढण्याचे कारण असे होते की, अंदाजे हवामान आणि कमी पावसामूळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नाश, महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली २०१७ ची कर्जमाफी यामध्ये योजनांची अयोग्य अंमलबजावणी, वन हक्क कायदा २००६ ची अंमलबजावणी, बोंडअळीचा प्रादूर्भाव, अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे होणाऱ्या कापसाच्या पिकांच्या नूकसानीची भरपाई उत्पादन खर्चाच्या दीडपट किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीची अंमलबाजवणी यामूळे आलिकडच्या काळात देशातील सर्वात मोठा शांतता पूर्ण निषेध मोर्चा काढण्यात आला होता. या लाँग मार्चचे नेतृत्व किसान सभा नेते अजित नवले, अशोक ढवळे, जीवा पांडू गावीत, विजू कृष्णन यांनी केले.

शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या हितासाठी नेतृत्व केल्यामुळे तीन कृषी कायदे मागे घेण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारनं संसदेत पारित केलेल्या कृषी विधेयकांवर राष्ट्रपती रामनाथ कोंविद यांनी २७ सप्टेंबर २०२० रोजी स्वाक्षरी केली. मात्र २९ नोव्हेंबर २०२१ रोजी त्यांनी हे कायदे रद्द करण्याची घोषणा केली.

पहिला कायदा : शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सूविधा) कायदा २०२०

हा कायदा कृषी मालाच्या विक्रीसंबंधी तरतूदी करतो. या कायद्या संबंधी मालाच्या विक्रीसंबंधी शासनाच म्हणण असं आहे की, शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळावी आणि त्यांच्या मालाला लवकरात लवकर गिऱ्हाईक मिळावं यासाठी या सुविधा केल्या जात आहेत. शेतकरी संघटनेचा यावर आक्षेप असा आहे की किमान आधारभूत किंमतीची यंत्रणा यामूळे मोडकळीस येईल.

दुसरा कायदा :- शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२०

हा कायदा कंत्राटी शेतीबद्दल आहे. शेकऱ्याला ते घेत असलेल्या पिकासाठी आगाऊ स्वरुपात करार करता येण्याची तरतूद यात केलेली आहे. भारतात सध्याही काही प्रमाणात अशा प्रकारची कंत्राटी शेती पहायला मिळते. पण याला कायदेशीर स्वरुप देण्याचा हा प्रयत्न आहे. शेतकरी संघटणेचा हा आक्षेप आहे की शेतकरी खरच याचा फायदा करुन घेऊ शकतील का? कंत्राटी व्यवस्थेत शेतकरी सक्षमपणे वाटाघाटी करु शकतील का?

तिसरा कायदा:- अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा Essential commodities (Amendment) Bill म्हणजे अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) विधेयक कायदा.

यावरुन वाद होतोय सरकारने अनेक कृषी उत्पादन या यादीतुन वगळण्याचा निर्णय घेतलाय. डाळी , कडधान्य , तेलबीया , कांदा ,बटाटे यांना अत्यावश्यक वस्तूंच्या यादीतून वगळले आहे यामुळे साठा करण्यावर निर्बंध रहाणार नाहीत, अपवाद यूध्दसदृश्य असामान्य परिस्थीती या कायद्यावर शेतकरी संघटनेचा असा आक्षेप आहे की मोठ्या कंपन्या वाटेल तेवढा साठा करु शकतील , शेतकऱ्यांना कंपण्याच्या सांगण्याप्रमाणे उत्पादन करावं लागेल आणि कमी किंमत मिळण्याचीही भिती वाटते.

विषयाची निवड व महत्व

"महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या राजकीय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास " हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे. महाराष्ट्र हे राज्य पुरोगामी विचाराचे राज्य आहे. महाराष्ट्रात स्वातंत्र्यापूर्वी काही शेतकरी चळवळी होऊन गेल्या त्यात त्यांनी आदिवासी शेतकरी वर्गाला न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. त्याचबरोबर सावकार जमीनदार वर्गाकडून गरीब शेतकरी वर्ग शेतमजूर यांची पिळवणूक होत असे तसेच अलिकडच्या काळात ही संघटना शेतकऱ्यांच्या

शेतीमालाला भाव मिळावा यासाठी प्रयत्न करत असते यामूळे या विषयाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

शेतकरी संघटना ही जून्या चळवळीचे सातत्य राखून प्रगत राजकारणाचे अंतर्गत प्रवाह जोपासताना दिसते. शेतीवर उपजीविका करणाऱ्या सर्व घटकांना शेतकरी या संज्ञेत अंतर्भूत करून शेतकरी संघटनेचा विचार आणि कार्य उद्‌बोधक ठरले आहे. तथापि राजकारणाच्या दृष्टीने शेतकरी संघटनेचा विचार प्रगतीशील आहे की क्रांतीकारी वा वर्चस्ववादी सत्तेला आव्हान देणारा आहे. या मूद्याचा पाठपूरावा करून त्यातील सत्यता पडताळून पाहणे उचित ठरणार आहे. शेतकऱ्यांची संघटना ही अराजकीय स्वरूपाची संघटना आहे. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारीत रास्तभाव मिळाला पाहिजे. ही तीची एकमेव मागणी व कार्यक्रम आहे. या कार्यक्रमासाठी ती प्रस्थापित सत्ता केंद्राला आंदोलनाच्या माध्यमातून आव्हाने उभी करताना दिसते याचा अर्थ ती राज्यसंस्था वा एखाद्या राजकीय पक्षाविरोधी आहे असे नाही ती देशातील शेतकरी जनसमूदायाला शेतमजूर कामगार दलित स्त्रिया इत्यादीशी जोडून शेतकरी आंदोलनाचा प्रवाह बळकट करू इच्छिते शेतकरी आंदोलन हे फक्त शेतीमालाच्या रास्त किंमतीशीच संबंधीत आहे असे नाही तर त्यात संपूर्ण देशातील दारिद्र्यांचे निराकरण करण्याची क्षमता असल्याचे संघटनेचे नेते प्रतिपादन करतात त्यामूळे या विषयाला महत्व प्राप्त झालेले आपणाला दिसून येईल.

संशोधन साहित्याचा आढावा

पश्चिमी विश्वात निर्माण झालेल्या औद्योगिकत्तर समाजात विविध सामाजिक चळवळी अथवा आंदोलने याचा अभ्यास करताना पारंपारिक चौकटीची विश्वासार्हता संपूष्टात येऊन लोकांच्या इच्छा आकांक्षाचा भंग झालेला दिसतो. त्यामुळे जनआंदोलनाचा अभ्यास करताना समाजातील भिन्नता लक्षात घेऊन मॅकेल फूको सारख्या तत्ववेत्यांनी उत्तर आधुनिकता पध्दतीने तर लुकान सारख्या अभ्यासकाने नवसामाजिक चळवळीचा दृष्टिकोन मांडून अभ्यास केला आहे. सर्वसाधारण १९६० नंतर पाश्चिमात्य जगात सामाजिक चळवळी नविन परिप्रेक्षातुन विचारात घेण्यात

आल्या त्यामुळे नवसामाजिक चळवळ संबंधीचे ज्ञान अनेक ग्रंथ संशोधन पत्रिकातून प्रकाशित झालेले आहे ते खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) देशपांडे माया, शरद जोशीचे नेतृत्व-एक चिकित्सक अभ्यास

महाराष्ट्रात १९८० साली राजकीय अस्थिरता निर्माण होऊन नेतृत्वाने विश्वासार्हता गमावली होती. या पार्श्वभुमीवर शेतीमालाच्या रास्त भावाच्या मागणीसाठी श्री शरद जोशी यांनी शेतकऱ्यांचे आंदोलन उभारले. माजी सनदी अधिकारी राहिलेले श्री जोशी चारित्र्यसंपन्न व सामाजिक प्रश्नाविषयी तळमळ असणारे आहेत. म्हणून शेतकऱ्यांनी त्यांचे नेतृत्व स्वीकारले एवढेच नाही तर देशभरातील शेतकरी चळवळींनी त्यांच्या नेतृत्वाला मान्यता दिलेली दिसते.

२) डी. एन. धनागरे "The class character and politics of the farmers movement in Maharashtra during the १९८०"

या लेखात महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या संदर्भात केलेला अभ्यासही वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो, प्रस्तूत लेखात त्यांनी शेतकरी संघटनेची स्थापना वैशिष्ट्यांबरोबरच देशातील शेतीच्या विभाजनांचे विवरण करुन शेतीची मालकी विशिष्ट समाजगटाकडे केंद्रित झाल्याचे सांगितले आहे.

३) परुळेकर विजय "योध्दा शेतकरी"

या ग्रंथात शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या काळातील शेतकरी आंदोलनाच्या विश्लेषणाबरोबरच शरद जोशीची संघटना उभारणी व शेतकरी आंदोलनातील कर्तृत्व व कुशल नेतृत्वाला मध्यावर्ती मानून त्यांच्या चरित्रपटाच्या अंगाने वेध घेतला आहे. त्यामध्ये शेतकरी संघटनेचे नविन्यपूर्ण आंदोलन तंत्र त्याला शेतकऱ्यांचा लाभणारा अभूतपूर्व प्रतिसाद आणि शासनाच्या दडपशाहीचाही परामर्श घेतला आहे.

४) शरद जोशी , "शेतकरी संघटना:विचार आणि कार्यपध्दती"

शेतकरी प्रकाशानाने प्रकाशित केलेल्या या ग्रंथात शरद जोशीनी शेतकरी संघटनेचा उद्देश शेतीमालाच्या उत्पादन खर्च काढण्याची पध्दती शेतकरी संघटनेची विचारप्रणाली इंडिया विरुध्द भारत संकल्पनेचे विवेचन, भारताची उद्योगनीती

भारतातील वर्ग विग्रह, संघटनेला काय हवे, संघटनेच्या मागण्या ग्राहक संघटनेचे स्वरुप, आंदोलनाचे तंत्र याबाबत तर्कशुध्द व वस्तूनिष्ठ विवेचन करण्यात आले आहे. शेतकरी संघटनेच्या अभ्यासकांच्या दृष्टिने हा मौलिक ग्रंथ आहे. स्वतःच शेतकरी संघटनेचे मुख्य सूत्रधार असल्याने लेखकांनी अर्थातच आपले प्रतिपादन सर्व काही शेतकरी संघटनांच आहे असे केले आहे.

५) श्रीकांत सोळंके "शेतकरी चळवळ (१९८६)

लेखकाने या पुस्तकाला शेतकरी संघटनेच्या उदयांची कारणमीमांसा व पूर्वपीठीका मांडताना १९ व्या शतकातील शेतकरी चळवळीपासून आढावा घेतला आहे. हा आढावा घेऊन लेखकाने शेतकरी संघटनेच्या स्थापनेपूर्वी म्हणजे १९४० ते १९७८ एवढ्या प्रदिर्घ कालखंडात शेतकरी प्रश्नावर एकही चळवळ उभी राहू शकली नाही असे स्पष्ट केले आहे. तर राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे फारसे गांभीर्याने पाहत नसल्याचे सांगून अशा निर्वात पोकळीत शेतकरी संघटना उदयाला आल्याचे विवेचन केले आहे. शरद जोशींनी शेतकरी संघटना स्थापन करुन तिला नेतृत्व दिले. शेती उत्पादनात झालेली मूबलक वाढ व त्यांचे कोसळणारे भाव संघटनेच्या आंदोलन उभारणीत कारणीभूत ठरले. संघटनेने १९८० ते १९८३ नंतर संघटनेने संघटनात्मक उभारणी केली.

६) शरद जोशी (मुलाखत) "बदलते राजकीय प्रवाह"

श्री शरद जोशी यांची (दि.७ जानेवारी १९९०) मुंबई दुरदर्शनवरील मुलाखत शेतकरी संघटकामध्ये मुद्रीत केली आहे. दुरदर्शनचे प्रतिनिधी नंदकूमार कारखानीस यांनी ही मुलाखत घेतली आहे. त्यांनी या मुलाखतीत स्थिर सरकार, संघटनेची राजकीय भूमिका, जातीयवादाला विरोध, पंजाब प्रश्न इत्यादी. बाबतीत प्रश्न उपस्थीत केले. केद्रात त्यावेळी नूकतेच जनता दलाच्या पूढाकाराने राष्ट्रीय आघाडीचे सरकार सत्तेवर आले होते. त्या पार्श्वभूमीवर ही मुलाखत महत्वाची आहे, ही संपूर्ण मुलाखत संघटनेची राजकीय भूमिका दलीत ऐक्य, धर्मवादी, पक्षाचे भवितव्य यावर प्रकाश टाकते.

संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये

१) महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेणे.

२) शेतकरी संघटनेच्या वैचारिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

३) महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेतील नेतृत्वाच्या कार्याचा आढावा घेणे.

४) महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाने केलेल्या कार्याचे मुल्यमापन करणे.

संशोधन विषयाची गृहितके

१) महाराष्ट्रातील शेतकरी संघटना स्वातंत्र्योत्तर काळात विकसीत झालेली आहे.

२) शेतकऱ्यांचे हित हा शेतकरी संघटनेचा पाया आहे.

३) शेतकरी संघटनेने राजकीय क्षेत्रात न्यायपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

४) शेतकरी संघटनेला योग्य नेतृत्व लाभले.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संशोधनाच्या हेतूने अभ्यासाचे क्षेत्र निश्‍चित करून त्यावर सखोल, व्यापक व सर्वांगिण अभ्यास करण्यात येईल. स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकरी संघटना चांगल्या प्रकारे काम करु लागली. १९७९-८० साली शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने काम करण्यास सूरवात केली. आज महाराष्ट्राच्या राजकारणाला एक पूरोगामी चेहरा प्राप्त झाला आहे. या पूरोगामी जडण-घडणीत शेतकरी संघटनाची भूमिका महत्वाची ठरलेली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या राजकारणातील शेतकरी संघटनेचे संशोधन करण्याचा प्रयत्न केला जाईल. या भूमिकेतून अभ्यासाची व्याप्ती निश्‍चित करून संशोधन करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला विषय "महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या राजकीय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास" आहे. प्रस्तुत संशोधन अधिक व्यापक

असल्यामूळे संशोधनाला काही मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत. हे संशोधन इ.स.१९८० ते इ.स. २००० असा कालखंड अभ्यासण्यासाठी घेण्यात आलेला आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व द्वितीय सामग्रीवर आधारीत आहे. माहिती संकलनासाठी खालील स्त्रोतांचा वापरे करण्यात येईल.

अ) प्राथमिक स्त्रोत

शेतकरी संघटनेमध्ये योगदान दिलेल्या काही निवडक कार्यकर्त्यांच्या कार्यपद्धतीची अभ्यास केला जाईल. या संशोधन कार्याच्या पूर्ततेसाठी शासकीय अहवाल, भाषणे, विधानसभा व विधान परिषदेमधील डिबेट या पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

ब) द्वितीय स्त्रोत

द्वितीय सामग्रीसाठी विविध संगणकाचे संकेतस्थळे, प्रकाशित ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे इत्यादीद्वारे माहिती गोळा केली जाईल. संकलित माहितीचे विश्लेषण करून योग्य ते निष्कर्ष काढले जातील. प्रस्तुत संशोधन कार्यात ऐतिहासिक, अनुभववादी, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

प्रकरणाची रूपरेषा

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी "महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या राजकीय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास" या विषयाची सहा प्रकरणामध्ये विभागणी केली असुन ती पुढीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन पद्धती, संशोधन साहित्याचा आढावा या विषयी माहिती घेण्यात येईल. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतात अनेक सामाजिक चळवळीनी दबाव

गटाचे राजकारण केलेले दिसते. महाराष्ट्राला तर अशा सामाजिक चळवळीची श्रेष्ठ परंपरा आहे. या परंपरेनूरूप संयूक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर प्रस्थापित समाजव्यवस्था बदलण्यासाठी अनेक सामाजिक चळवळी येथे उदयाला आल्या त्यामध्ये स्त्री मूक्ती चळवळ दलित चळवळ आदिवासी व शेतकऱ्यांच्या चळवळींचा उल्लेख करावा लागेल. या चळवळींनी आपल्या समूदायावरील अन्याय दूर करण्यासठी प्रस्थापित व्यवस्थेत बदल घडविण्यासाठी जनसमूदायाचे संघटन करून भिन्न चळवळी उभारल्या आहेत. या चळवळींनी दलित आदिवासी व शेतकऱ्यांची अनन्वित अत्याचार व पिळवणूकीतून मुक्तता करण्याचा प्रयत्न केला म्हणून चळवळीचा शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी त्यांचा संकल्पनात्मक परिप्रेक्ष्य समजावून घेणे आवश्यक आहे.

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा

कोणत्याही संशोधन साहित्याचा आढावा घेत असताना त्यापूर्वी त्या विषयावर कोणता अभ्यास झाला आहे. याचा मागोवा घेणे म्हणजे संशोधन साहित्याचा आढावा घेणे होय. संशोधन साहित्याचा आढावा घेत असताना संशोधकाला आपल्या विषयाशी संबंधीत असलेल्या विषयावरील विविध प्रकारचे प्रकाशीत झालेले पुस्तके, लेख, मासिके या सर्व प्रकारची वाचन साहित्य जमा करावे लागते. विशिष्ट हेतू मनाशी बाळगून हे वाचन करायचे असते.

संशोधनाच्या क्षेत्रात ज्या अभ्यासकांनी, लेखकांनी व विचारवंतांनी आपले विचार मांडून आपले योगदान दिले आहे. त्यांच्या संशोधनाचे संकलन म्हणजे संशोधन साहित्याचा आढावा होय. कोणतेही शास्त्रीय संशोधन हे संशोधन साहित्यांच्या आढाव्यापासून सुरु होते. तार्किक आणि व्यवस्थितरित्या पूर्वसंशोधन झालेल्या वाचनसाहित्याचा आढावा घेतल्यास त्या आधारे संशोधन केल्यास आपले संशोधन योग्यरित्या केले जाईल. अशा प्रकारे संशोधन साहित्याचा आढावा हा जून्या साहित्याचा नव्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी उपयूक्त असतो. त्यामुळे संशोधकाला नवी परिस्थिती लक्षात येते.

प्रकरण तिसरे : महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणाला स्वातंत्र्यानंतर झालेली आंदोलने सांगण्यात येतील उदाहरणा दाखल सांगयचे झाले तर हैद्राबाद संस्थानमध्ये शेतकऱ्यांनी गावातील जमीनदार, देशमुख, वतनदार, सावकार व जहागीरदाराविरूद्ध उभारलेला लढा महाराष्ट्राच्या पातळीवर विचार करता कम्यूनिस्ट पक्षाची किसान सभा, शेतकरी कामगार पक्ष, कष्टकरी संघटना, श्रमिक संघटना यांनी केलेले कार्य सांगण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य जे देशातील सामाजिक व राजकीय चळवळींचे केंद्र मानले जाते. अशा महाराष्ट्र राज्यातही शेतकरी दूर्लक्षित राहिला होता. त्याच्या प्रत्यक्ष जीवन व्यवहाराशी निगडीत असलेले शेतीचे प्रश्न निकाली निघत नव्हते. यासाठी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून याचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण चौथे : महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेतील राजकीय नेतृत्व

प्रस्तुत प्रकरणामध्ये शेतकरी संघटनेची नेते मंडळी शेतीमालास रास्त भाव या एककलमी कार्यक्रमासाठी कांदा, ऊस, तंबाखू, भात, कापूस इत्यादी पिके पिकविणाऱ्या व दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व करतात. त्यासाठी वारंवार उपोषण, तुरूंगवास, मेळावे, प्रशिक्षण शिबीरे, आंदोलने केले आहेत.

शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चळवळ उभा करण्याचे कारण असे की राजकीय अस्थिरता, काँग्रेस श्रेष्ठीची भूमिका, पक्षीय निष्प्रभता, शेती उत्पादनात झालेली प्रचंड वाढ, खते बि-बियाणे आणि शेती अवजारांच्या वाढणाऱ्या किंमती, शासनाचे शेतीविषयक धोरण यामूळे शेतकरी संघटनेच्या राजकीय कार्याचा आढावा घेण्यात येईल. शेतकरी संघटनेने राज्याचे अर्थकारण आणि राजकारण प्रभावित करून राज्यात शेतकऱ्यांची शाश्वत शक्ती निर्माण केली. त्यांना शेतकरी

आंदोलनाच्या या नव्या अविष्काराने मूलगामी राजकारणाला अनूरुप संघटनेची भूमिका शोषितांच्या संघर्षाला गती देणारी ठरली आहे.

प्रकरण पाचवे : महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेतील नेतृत्वाच्या कार्याचे मूल्यमापन

शेतकरी संघटना ही परंपरागत शेतकरी चळवळीचा मार्ग नाकारून नव्या पद्धतीने शेतकरी जनसमूदायाच्या शोषण व दारिद्र्याचा निर्देश करते. तो करताना ती औपचारिक संघटनात्मक रचनेच्या जोखडात स्वतःला गुंतवून घेण्यास तयार नाही. कारण त्यामुळे कार्यकर्त्यांचे आपल्या ध्येयावरून लक्ष विचलीत होण्याची तीला भीती वाटते. तर तेच शेतकरी संघटनेचा उदय नाविन्यापूर्ण आंदोलनातून झाला असून आंदोलन हा संघटनेचा प्राणवायू आहे.

शेतकरी संघटनेतील राजकीय नेतृत्वाने शेतकऱ्याच्या मालाला रास्त भावाच्या मागणीसह शेतकरी शेतमजुरांच्या अनेक जिल्ह्याचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. देशातील दारिद्र्य हे शेतीमालाला रास्तभाव न मिळाल्याचा परिणाम असल्याने दारिद्र्य निर्मूलनासाठी रास्त भावाची मागणी मान्य झाली पाहिजे असे प्रतिपादन करून संघटनेने शेतीमालाला रास्तभाव मिळाल्यानंतर शेतमजूरांचेही मजूरीचे दर वाढतील असा आशावाद व्यक्त केला शासनाच्या उद्योग व शेतीबाबत पक्षपती धोरणाने देशातील ग्रामीण दारिद्र्याला चालना दिल्याचे संघटनेचे मत आहे. संघटनेने शेतीमालाला रास्तभाव शेतमजूर व कारागिरांचे मजूरीचे दर राज्याचे कार्यक्षेत्र मर्यादीत करणे देशातील दारिद्र्य व आर्थिक विषमता स्त्रियांचे शोषण व संपत्तीचा मालकीहक्क असे असंख्य प्रश्न उपस्थित करून मूलगामी राजकारणाची सुरूवात केलेली दिसते. म्हणून संघटनेच्या आंदोलनात्मक कार्यक्रमाला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी भरभरून पाठिंबा दिला. त्यामूळे संघटनेचा प्रसार झाला आणि प्रभावही वाढलेला दिसतो.

प्रकरण सहावे : सारांश व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास सारांश रूपाने मांडण्यात येईल. तसेच संशोधनातून निघालेल्या निष्कर्षाचा आढावा घेण्यात येईल.

महाराष्ट्रात १९८० च्या दशकात शेतकऱ्यांचा दबावगट म्हणून शेतकरी संघटनेचा उदय झाला शेतकरी संघटनेने शेतीमालाच्या रास्त भावाच्या प्रश्नावर शेतकऱ्यांची विराट स्वरूपाची आंदोलने उभारून शासनासमोर आव्हाने उभी केली. संघटनेच्या आंदोलनाने संपूर्ण देशाचे अर्थकारण व राजकारण प्रभावीत केले. शेतकरी संघटनेने जन आंदोलनाच्या माध्यमातून मूलगामी राजकारणाची मूहर्तमेढ रोवली आहे. शेतकरी संघटनेने पारंपारिक चळवळीला छेद देऊन शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळताना चळवळीचे नवे संदर्भ निर्माण केलेले दिसतात. शेतकरी संघटना ही शेतकऱ्यांची अलीकडील काळातील सर्वात मोठी संघटना आहे.

शेतकरी संघटनेच्या माध्यमातून जनआंदोलनाच्या आशयाची पूर्ननिर्मीती केली आहे. शेतकरी संघटनेने शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित रास्तभाव मिळाला पाहिजे या मागणीसाठी उभारलेल्या आंदोलनातून देशातील शेतकरी संघटनेला वैचारीक अधिष्ठान देऊन एकूणच देशातील शेतकरी आंदोलनाला नवी दिशा प्राप्त करून दिली आहे.

संदर्भ सूची

१) फडणीस जगन (१९७८) शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण, अजब पुस्तकालय, कोल्हापूर १९७८.

२) जोशी शरद (२००४) शेतकरी संघटना, विचार व कार्यप्रणाली, शेतकरी प्रकाशन, अलिबाग.

३) सोळूंके श्रीकांत, शेतकरी चळवळ, बी. रघुनाथ प्रकाशन परभणी १९९६

४) बिपन चंद्र आणि इतर ' इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स ' अनुवाद के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००४.

५) व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, महाराष्ट्रातील सत्तांतर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९६.

६) एस.एम. जोशी "संयूक्त महाराष्ट्र : स्वप्न आणि वास्तव " संयूक्त महाराष्ट्र : काल आणि आज (संपादक : प्रा. भगवान काळे) संकेत प्रकाशन जालना, १९८५.

७) महाराष्ट्र किसान सभेची घटना, महाराष्ट्र किसान सभा, प्रकाशन मुंबई, १९६९.

८) १२ ई.टी ऑनलाईन मार्च २०१८ आय.एस. टी. ८:१०pm किसान लॉग मार्च इकॉनॉमीक टाइम्स व्हिडीओ ई. टी. नाउ २०१८.

९) जोशी शरद, भीक नको हवे घामाचे दाम, शेतकरी प्रकाशन अलिबाग १९८४.

१०) म्हात्रे सुरेशचंद्र, शेतकरी संघटक, पाक्षिक राजकीय भूमिकेचे दशक, नागपूर अधिवेशन विशषांक १२ नोव्हेंबर १९९४.

११) स्वतंत्रता क्यों- नाकाम हो गयी, प्रकाशक सुरेशचंद्र म्हात्रे,आंबेठाण ता.खेड जि. पूणे. २००१.

१२) गांधी मोहनदास, मेरी कहानी, हिंदी, नवजीवन प्रकाशन अहमदाबाद.

१३) International enclyclopedia of the social science (plan) 1968 .

१४) Omvedt Gail, Reinvernting Revolution, New Social Movement and the socialist Tradition in India, London, England 1993.

१५) Lennberg conreis, sharad Joshi and the Farmers : The middle peasant Lives 1988.

संशोधक
सत्यवान नामदेव रेपे

मार्गदर्शक

प्रा.डॉ. प्रताप वामनराव पाटील
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
(सहयोगी प्राध्यापक)
बहिर्जी स्मारक महाविद्यालय वसमत,
ता. वसमत, जि. हिंगोली.